Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक ८ । पाने २।
DIGITAL EDITION

पेट्रोल १८ तर ३५ रूपयांनी महागणार

(पान २ वर)




Selected

## पाळधी येथे मतदार मॅपिंग कॅम्पचे आयोजन

पाळधी : पाळधी गावात नागरिकांचा मतदानाचा हक्क सुरक्षित राहावा यासाठी जीपीएस मित्र परिवाराच्या वतीने मतदार मॅपिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे गावातील सर्व मतदारांची माहिती अद्ययावत होऊन भविष्यात मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा येऊ नये, हा मुख्य उद्देश आहे. सदर कॅम्प १६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत शासकीय विश्रामगृह, पाळधी येथे आयोजित करण्यात आला आहे. गावातील सर्व नागरिकांनी या कॅम्पचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. मतदार मॅपिंग का महत्त्वाचे? मतदार मॅपिंग न केल्यास नागरिकांना भविष्यात मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता असून, काही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासही अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येकाने आपली नोंदणी व माहिती अद्ययावत करून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण स्थगितीची मागणी

# अनुसूचित जाती आरक्षणावर वाद

## नाना पटोले यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र; पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

मुंबई : अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेवरून राज्यात नवीन वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी या प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करत ती तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे. त्यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

मात्र, सध्या सुरू असलेल्या उपवर्गीकरण प्रक्रियेत ही पारदर्शकता दिसून येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. समितीचा अहवाल सार्वजनिक न करता थेट आक्षेप मागवले जात असल्याने अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. समितीच्या रचनेवरही प्रश्न पटोले यांनी उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीवरही आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते, या समितीत समाजातील प्रतिनिधींना स्थान न देता केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच अत्यंत कमी कालावधीत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याने सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांना धक्का बसत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेवरून राज्यात नवीन वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी या प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करत ती तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे. त्यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

मात्र, सध्या सुरू असलेल्या उपवर्गीकरण प्रक्रियेत ही पारदर्शकता दिसून येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. 'बदर समिती' अहवाल जाहीर करण्याची मागणी या पार्श्वभूमीवर पटोले यांनी काही ठोस मागण्या मांडल्या आहेत: उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी 'बदर समिती'चा संपूर्ण अहवाल सार्वजनिक करावा राज्यभर व्यापक जनसुनावण्या आयोजित कराव्यात अनुसूचित जाती-जमातीतील सर्व स्तरातील मतांचा विचार करावा तज्ज्ञ, समाजप्रतिनिधी आणि निवृत्त सनदी अधिकाऱ्यांचा समावेश असलेली नवीन समिती स्थापन करावी सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा आरक्षण उपवर्गीकरणाचा विषय हा अत्यंत संवेदनशील मानला जातो. त्यामुळे या प्रक्रियेत सर्व घटकांचा सहभाग आणि पारदर्शकता आवश्यक असल्याचे पटोले यांनी अधोरेखित केले. सरकारकडून या मागण्यांवर काय भूमिका घेतली जाते, याकडे आता राज्यातील विविध सामाजिक संघटनांचे लक्ष लागले आहे.

### 'पारदर्शकतेचा अभाव'; प्रक्रियेवर आक्षेप

पटोले यांनी आपल्या पत्रात नमूद केले की, आरक्षण हा कोणत्याही व्यक्ती किंवा कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी नसून सामाजिक न्याय आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी आहे. त्यामुळे आरक्षणाच्या स्वरूपात कोणताही बदल करताना पारदर्शक, न्याय्य आणि सर्वसमावेशक प्रक्रिया आवश्यक असते.



विशेष बातमी

# वर्धा जिल्ह्यात उष्णतेचा कहर

## शाळा-अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर

जन सम्राट टाईम्स



**वर्धा** :विदर्भात वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा तीव्र फटका बसत असून, प्रशासनाने मोठा निर्णय घेत १६ एप्रिल रोजी सर्व अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. तापमान ४३ ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी यासंदर्भात अधिकृत आदेश निर्गमित केले असून, उष्णता लाटेच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून शाळा बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषतः लहान मुलांवर उष्णतेचा परिणाम अधिक होण्याची शक्यता लक्षात घेऊन अंगणवाडी केंद्रेही बंद ठेवण्यात येणार आहेत. भारतीय हवामान विभाग (IMD) च्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये आधीच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे गेला असून, उष्णतेचा प्रचंड तडाखा नागरिकांना जाणवत आहे. अकोला येथे ४४.२ अंश, अमरावती येथे ४४.० अंश, तर नागपूर येथे ४३.४ अंश तापमानाची नोंद झाली आहे. वर्धा जिल्ह्यातही तापमान ४३.९ अंशांपर्यंत पोहोचल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. हवामान विभागाने यापूर्वीच वर्धा जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' जारी केला असून, उष्णलाटेची शक्यता व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने पावले उचलत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना दुपारच्या कडाक्याच्या उन्हात बाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी पिणे, डोक्यावर टोपी किंवा ओढणी वापरणे तसेच हलके व सैल कपडे परिधान करणे, अशा उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्येही उष्णतेची तीव्रता कायम असून चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ येथेही तापमान ४२ अंशांच्या पुढे गेले आहे. पुढील काही दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासन सतर्क झाले आहे.

### सूचनांचे पालन करावे, असे आवाहन

उष्णलाटेमुळे निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ नये, यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत अधिकार वापरून हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणाऱ्या या निर्णयाचे पालकांकडून स्वागत होत असून, नागरिकांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ब्रेक न्यूज

## बाबासाहेबांचे योगदान क्षणोक्षणी प्रेरणादायी : आहेराव

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**सोलापूर :** धरणगाव येथील विक्रम ग्रंथालय व मोफत वाचनालयात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. या निमित्ताने छोटेखानी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांची उजळणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रंथालयाचे सचिव महेश आहेराव, ज्येष्ठ संचालक ललित उपासनी तसेच नुकतेच पोलीस खात्यात नियुक्त झालेले शिवदास पारधी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनीही कृतज्ञतेने बाबासाहेबांना वंदन केले. यावेळी बोलताना महेश आहेराव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सोप्या आणि प्रभावी शब्दांत आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी समाजातील वंचित, दुर्बल आणि शोषित घटकांना न्याय, समता आणि शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. भारतीय राज्यघटनेची निर्मिती करून त्यांनी देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क प्रदान केले, ही त्यांची सर्वात मोठी देणगी आहे."शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा बाबासाहेबांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा असून तो समाजाला प्रगतीच्या दिशेने नेणारा मार्गदर्शक आहे, असेही आहेराव यांनी नमूद केले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी बाबासाहेबांचे विचार आणि कार्य प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी ठरत राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवदास भिका पारधी होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनीही बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

### विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित

या कार्यक्रमास ग्रंथालयाचे सर्व संचालक, वाचक तसेच अभ्यास करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल भगवान कुंभार यांनी केले.कार्यक्रम सुरळीत पार पडला. एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित हा कार्यक्रम केवळ औपचारिकता न राहता विचारप्रबोधनाचा आणि प्रेरणेचा एक महत्त्वपूर्ण मंच ठरला.

## राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचा विक्रम

### मागासवर्गीयांच्या सक्षमीकरणाला चालना; ६१३ कोटींचे कर्जवाटप

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली: केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने (एनबीसीएफडीसी) आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. या कालावधीत तब्बल ₹६१३ कोटींच्या निधीचे कर्जवाटप करण्यात आले असून, महामंडळाच्या स्थापनेपासूनचा हा सर्वाधिक वार्षिक आकडा ठरला आहे. या ऐतिहासिक कर्जवाटपामुळे देशातील मागासवर्गीय घटकांच्या आर्थिक उन्नतीस मोठी चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील गरजू कुटुंबांसाठी हा निधी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. महामंडळाने वितरित केलेला हा निधी प्रामुख्याने स्वयंरोजगार, लघु उद्योग आणि कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणार आहे. यामधून तरुणांना उद्योजकतेची संधी मिळून त्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावरही विशेष भर देण्यात आला आहे. या योजनांच्या



अंमलबजावणीसाठी विविध राज्यस्तरीय वाहिन्या, राष्ट्रीयीकृत बँका तसेच प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या माध्यमातून निधी थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा उद्देश साध्य होत आहे. गेल्या काही वर्षांत महामंडळाने कर्ज मंजुरी प्रक्रियेत सुलभता आणली असून, डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर केल्याने निधी वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. पारदर्शक आणि जलद प्रक्रियेमुळे लाभार्थ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कर्जवाटपात झालेली मोठी वाढ ही सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणाच्या धोरणांची यशस्वी अंमलबजावणी असल्याचे मानले जात आहे. या उपक्रमामुळे हजारो कुटुंबांना शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्रात उष्माघाताचा अकोल्यात पहिला बळी

जन सम्राट टाईम्स

**अकोला:** राज्यात वाढत्या उष्णतेने आता गंभीर स्वरूप धारण केले असून अकोला जिल्ह्यात उष्माघाताचा पहिला बळी गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील बहुतांश भागात तापमानाने चाळिशी ओलांडली असून नागरिकांचे जनजीवन अक्षरशः त्रस्त झाले आहे. अकोला शहरातील जुने शहर पोलीस ठाणे हद्दीत एका मालवाहू ऑटोमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. मृतदेहावर कोणत्याही जखमा किंवा मारहाणीचे चिन्ह नसल्याने उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून वैद्यकीय अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. विदर्भात उष्णतेची तीव्र लाट विदर्भात उष्णतेची लाट अधिक तीव्र झाली आहे. अकोल्यात तापमान ४४ अंश सेल्सिअसवर पोहोचले असून अमरावतीतही पारा ४३ अंशांच्या पुढे गेला आहे. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असून नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळल्याचे चित्र दिसत आहे. यवतमाळमध्ये तापमान ४३.२ अंशांवर गेले असून एप्रिल-मे महिन्यात ते ४५ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे नागरिकांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. जळगाव, बीड, ठाण्यातही उकाड्याचा कहर जळगाव जिल्ह्यात यंदाच्या हंगामातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली असून पारा ४२.५ अंशांवर गेला आहे.

## बदलापूरमध्ये सत्कर्म आश्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के.) तर्फे मुलांना अल्पोपहार वाटप

जन सम्राट टाईम्स

**बदलापूर :** बदलापूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के.) पक्षाच्या वतीने सत्कर्म आश्रमात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत आश्रमातील मुलांना अल्पोपहार वाटप करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आश्रमातील मुलांना खाऊ आणि अल्पोपहार देण्यात आला. या वेळी



"केवळ जयंती साजरी करण्यापेक्षा गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली आहे," अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

या कार्यक्रमाला पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. बदलापूर शहराध्यक्ष अशोक गजरमल, सरचिटणीस भाऊ शिर्के, योगेश साळवे, शुभम भोसले, कमलताई गजरमल तसेच सुभाष रणपिसे यांच्यासह इतर मान्यवरांनी सक्रिय सहभाग नोंदवला. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून समाजातील वंचित आणि गरजू घटकांसाठी अशा सामाजिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमादरम्यान मुलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. या उपक्रमाचे सत्कर्म आश्रम प्रशासन तसेच स्थानिक नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. समाजाभिमुख कार्याच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या विचारांना कृतीत उतरवण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले. एकूणच, सामाजिक जाणिवा आणि मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम बदलापूरमध्ये प्रेरणादायी ठरला.

अँकर न्यूज

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन तीव्र

## व्याजवसुली प्रकरणी संताप; प्रलंबित प्रश्नांवर तोडगा न निघाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा

जन सम्राट टाईम्स

धरणगाव/जळगाव - : धरणगाव तालुक्यातील झुरखेडा येथे शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेले आंदोलन आता अधिक तीव्र झाले असून, आमरण उपोषणाचा दुसरा दिवस बुधवारी पार पडला. लोकनियुक्त सरपंच सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या उपोषणाला गावासह परिसरातील शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. झुरखेडा येथील स्वयंभू महादेव मंदिराच्या आवारात सुरू असलेल्या या आंदोलनस्थळी पहिल्या




दिवसापासूनच शेतकऱ्यांची लक्षणीय उपस्थिती दिसून येत आहे. दुसऱ्या दिवशीही मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दर्शवत असल्याने प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे. आंदोलनामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.आंदोलनकर्त्यांनी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर गंभीर आरोप करताना सांगितले की, शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करून 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७' अंतर्गत शेतकऱ्यांकडून बेकायदेशीररीत्या व्याज वसूल करण्यात आले. या संदर्भात अनेकदा शासन दरबारी पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात शेतकऱ्यांनी विविध महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. श्री. गुलाबराव बाबूराव देवकर यांच्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची सखोल चौकशी करून सहकार मंत्र्यांनी दिलेली स्थगिती तात्काळ उठवावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत आकारण्यात आलेले व्याज तात्काळ परत करावे व पुढील काळात व्याज आकारणी बंद करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, मागील सहा वर्षांपासून पीककर्ज न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्याची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. नाशिक येथील अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणा व कर्तव्यच्युतीबाबत शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना पदावरून हटवण्याची मागणीही जोर धरत आहे

### आंदोलनाचा आवाका वाढण्याची चिन्हे

आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला आहे की, त्यांच्या मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय घेतला गेला नाही, तर हे आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल. उपोषणादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस शासन व प्रशासन जबाबदार राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या आंदोलनाला विविध शेतकरी संघटनांचा पाठिंबा मिळण्याची शक्यता असून, पुढील काही दिवसांत आंदोलनाचा आवाका वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

## काळोख दाटणार! कडाक्याच्या उन्हात 'अवकाळी'चा इशारा!

जन सम्राट टाईम्स

पुणे : राज्यात कडाक्याच्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच आता हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामान विभाग (IMD) ने १६ एप्रिलसाठी जारी केलेल्या अंदाजानुसार, देशभरात वेगवेगळ्या भागांत भिन्न प्रकारचे हवामान अनुभवायला मिळणार आहे. काही ठिकाणी उष्णतेची तीव्रता वाढणार असताना, तर काही भागांत अवकाळी पाऊस आणि हिमवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून महाराष्ट्रसह अनेक राज्यांत तापमानाचा पारा झपाट्याने वाढला असून अनेक शहरांमध्ये तो ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. त्यामुळे नागरिकांना उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशातच हवामान विभागाच्या अंदाजामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होण्याची शक्यता आहे. उत्तर भारतात उष्णतेची लाट हवामान खात्याच्या माहितीनुसार उत्तर भारतात तापमान आणखी वाढण्याचा अंदाज आहे. विशेषतः दिल्ली येथे यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच तापमान ४० अंशांच्या जवळ पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे उष्णतेची लाट तीव्र होण्याचा इशारा देण्यात आला आहे. चंदीगड येथे कमाल तापमान ३६ आणि किमान १७ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. तर दिल्ली मध्ये कमाल ३९ आणि किमान २० अंश सेल्सिअस राहू शकते.

» Selected

### एसटीचा दैनंदिन एक कोटी ६० लाख तोटा कमी करण्याचे आव्हाण

मुंबई: राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एसटी) आर्थिक वर्षातील उत्पन्न ११ हजार ४७५ कोटी रुपये असून खर्च १२ हजार ६६ कोटी आहे. एसटीचा दैनंदिन तोटा एक कोटी ६० लाख रुपये आहे. हा तोटा कमी करण्यासाठी विविध प्रकाराच्या उपाययोजना करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. एसटीचे दैनंदिन सरासरी उत्पन्न ३१ कोटी ४० लाख आहे. त्याचवेळी खर्च ३३ कोटी रुपये आहे. दररोज एसटी महामंडळ एक कोटी ६० रुपये तोटा सहन करावा लागत आहे. हा तोटा चिंतेचा विषय असल्याचे मत सरनाईक यांनी व्यक्त केले.

मागील आर्थिक वर्षात जालना, परभणी, बुलढाणा, भंडारा, गडचिरोली, अकोला, धुळे आणि वर्धा हे ८ विभाग नफ्यात होते. उर्वरित २३ विभागापैकी नाशिक, कोल्हापूर, नागपूर, रत्नागिरी, सातारा आणि ठाणे या मोठ्या विभागांचा वाढता तोटा गंभीर चिंतेचा विषय असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. येत्या आर्थिक वर्षात वाहतुकीचे सुयोग्य नियोजन करा, उपलब्ध बसेस आणि मनुष्यबळाचा अधिकाधिक कार्यक्षम वापर करण्यात यावा. दीड ते दोन कोटी रुपयांचा दैनंदिन तोटा भरून काढणे हे आपले मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तोट्यातील विभागांची सखोल चौकशी केली जाईल. सातत्याने तोट्यात असलेल्या मोठ्या विभागांमध्ये कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यावर भर देण्यात येणार आहे.

# घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त : राज्यपाल

## चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्यांच्या विचारांमुळे वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी आणि न्यायाचा मार्ग मिळाला. संविधानातील मजबूत घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही अधिक सशक्त बनली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. दादर येथील चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्यपालांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकर यांच्या स्त्री-पुरुष समानतेसाठीच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकला. महिलांना शिक्षण, संपत्ती आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे होते. भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर महिलांना मतदानाचा समान अधिकार मिळण्यात त्यांचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर समाजाने जातीयतेपासून मुक्त आणि भेदभावविरहित भारत घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी मांडलेले चलनव्यवस्था, आर्थिक स्थैर्य आणि वित्तीय धोरणांबाबतचे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यांच्या 'प्रॉब्लेम्स ऑफ रुपी' या प्रबंधातून भारतात केंद्रीय बँकेची संकल्पना पुढे आली आणि त्याच विचारांवर आधारित 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतही त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाबासाहेबांना "माणुसकीचे शिल्पकार" संबोधत त्यांच्या कार्याचे स्मरण केले. त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळे देशातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला. महाड चवदार तळे सत्याग्रहासारख्या चळवळींमुळे समाजात आत्मसन्मानाची भावना जागृत झाली. त्यांनी इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचा उल्लेख करत ते पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी चैत्यभूमीला बाबासाहेबांच्या विचारांचे ऊर्जा केंद्र असे संबोधले. त्यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकर यांची जयंती ही प्रेरणा, संकल्प आणि कृतज्ञतेचा दिवस आहे. त्यांच्या समता, बंधुता आणि न्यायाच्या विचारांना आचरणात आणणे हीच खरी आदरांजली ठरेल. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन देशाचा सर्वांगीण विकास साधणे हेच त्यांच्या विचारांचे खरे पालन असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भिक्खूंना चिवरदान करण्यात आले तसेच महानगरपालिकेच्या वतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास भेट देण्यात आली. चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली, ज्यामुळे वातावरण अधिक भावनिक व उत्साहपूर्ण झाले.

### सामाजिक समतेचा संदेश

यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या कार्यावर आधारित 'समाजनायक संजय शिरसाट' या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूणच, चैत्यभूमीवरील हा सोहळा केवळ अभिवादनापुरता मर्यादित न राहता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची उजळणी करणारा आणि सामाजिक समतेचा संदेश देणारा ठरला. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, हा संदेश या कार्यक्रमातून पुन्हा अधोरेखित झाला.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# टाटा ट्रस्टमध्ये अंतर्गत वादाचा भडका!

## मेहली मिस्त्रींचा गंभीर आरोप

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** देशातील प्रतिष्ठित टाटा ट्रस्टमध्ये अंतर्गत मतभेद उफाळून आले असून, माजी विश्वस्त मेहली मिस्त्री यांनी ट्रस्टच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या सध्याच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत महाराष्ट्र धर्मादाय आयुक्तांकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. मिस्त्री यांनी आपल्या तक्रारीत ट्रस्टच्या सध्याच्या बोर्डाची रचना बेकायदेशीर असल्याचा दावा केला असून, काही विश्वस्तांच्या निर्णयांवर थेट प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी असा आरोप केला आहे की, काही वरिष्ठ विश्वस्तांनी वैयक्तिक फायद्यासाठी ट्रस्टच्या संसाधनांचा गैरवापर केला, तर काहींनी नियमबाह्य पद्धतीने कमिशन स्वीकारले. या आरोपांमुळे ट्रस्टमधील पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण झाले आहेत. याशिवाय, एका संलग्न ट्रस्टमध्ये 'पारसी' नसलेल्या व्यक्तींना विश्वस्त म्हणून नियुक्त करण्यात आल्याचा मुद्दा मिस्त्री यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, ही नियुक्ती ट्रस्टच्या मूळ नियमावलीचा भंग करणारी आहे. या सर्व गैरप्रकारांविरोधात आवाज उठवल्यामुळेच आपली फेरनियुक्ती जाणीवपूर्वक डावलण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. कायदेशीर पेच अधिक गडद

या वादाचे मूळ ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या एका महत्त्वाच्या ठरावात असल्याचे सांगितले जात आहे. या ठरावानुसार विश्वस्तांना आजीवन मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी निवडक व्यक्तींवरच करण्यात आली आणि स्वतःला त्यातून वगळण्यात आल्याचे मिस्त्री यांनी म्हटले आहे.

### 'वारसा जपण्यासाठी लढा'


रतन टाटा यांचे निकटवर्तीय मानले जाणारे मिस्त्री यांनी स्पष्ट केले की, हा लढा वैयक्तिक नसून ट्रस्टची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी आहे. "टाटा ट्रस्टचा वारसा आणि प्रतिष्ठा जपण्यासाठी पारदर्शकता आणि नियमांचे पालन आवश्यक आहे," असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या प्रकरणामुळे देशातील सर्वात प्रभावशाली परोपकारी संस्थांपैकी एक असलेल्या टाटा ट्रस्टच्या कारभारावर प्रश्न उपस्थित झाले.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# पेट्रोल महागणार?

## पाच राज्यांतील निवडणुकीनंतर दरवाढ

जन सम्राट टाईम्स




**मुंबई :** कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पेट्रोल १८ रुपये आणि डिझेल ३५ रुपये (प्रति लिटर) पर्यंत महाग होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगालसह पाच राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर कंपन्या दर वाढवू शकतात. ४ मे रोजी या निवडणुकांचे निकाल लागले की ही दरवाढ अटळ मानली जाते. विदेशी ब्रोकरेज फर्म मॅक्वायरीच्या अहवालानुसार कच्चे तेल महाग असूनही देशात पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर आहेत. यामुळे कंपन्यांना नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत ही दरवाढ अपरिहार्य होऊन बसली आहे.

कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे कंपन्यांना पेट्रोल प्रतिलिटर १८ रुपये आणि डिझेलवर ३५ रुपयांचे नुकसान होत आहे, असे कंपन्यांचे म्हणणे आहे. गेल्या महिन्यात उच्चांकी पातळीवर असताना या तिन्ही कंपन्यांना दररोज सुमारे २,४०० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत होते. उत्पादन शुल्कात १० रुपयांची कपात केल्यानंतर ते कमी होऊन १,६०० कोटी रुपयांवर आले. भारत सुमारे ८८ टक्के कच्चे तेल आयात करतो. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे, तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठीही धोकादायक आहेत. असा अंदाज आहे की, २०२६ च्या पहिल्या तिमाहीत ही तूट वाढून २० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकते. ती कमी करण्यासाठीही किरकोळ विक्रीचे दर वाढवले जाऊ शकतात.

### पेट्रोल 18 रुपयांनी तर 35 रुपयांनी महागणार

कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे कंपन्यांना पेट्रोल प्रतिलिटर १८ रुपये आणि डिझेलवर ३५ रुपयांचे नुकसान होत आहे, असे कंपन्यांचे म्हणणे आहे. गेल्या महिन्यात उच्चांकी पातळीवर असताना या तिन्ही कंपन्यांना दररोज सुमारे २,४०० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत होते. उत्पादन शुल्कात १० रुपयांची कपात केल्यानंतर ते कमी होऊन १,६०० कोटी रुपयांवर आले. भारत सुमारे ८८ टक्के कच्चे तेल आयात करतो.

# सॅमसन–ब्रेविसची झंझावाती भागीदारी, नूरचा फिरकीजादू

जन सम्राट टाईम्स

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : आयपीएल २०२६ मधील २२व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने कोलकाता नाईट रायडर्सवर ३२ धावांनी प्रभावी विजय मिळवत स्पर्धेत पुनरागमनाची लय कायम राखली. एम. ए. चिदंबरम स्टेडियम, चेपॉक, चेन्नई येथे झालेल्या या उच्च दर्जाच्या सामन्यात चेन्नईने २० षटकांत १९२/५ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात कोलकाताचा डाव २० षटकांत १६०/७ धावांवर रोखला गेला. संजू सॅमसनच्या आक्रमक फलंदाजीने, डेवाल्ड ब्रेविसच्या वेगवान साथीनं आणि नूर अहमदच्या फिरकीच्या जादूने सामन्याचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला. चेन्नईची सुरुवात आत्मविश्वासपूर्ण झाली. संजू सॅमसनने ३२ चेंडूत ४८ धावांची आक्रमक खेळी साकारत डावाला वेगवान गती दिली. दुसऱ्या टोकाला डेवाल्ड ब्रेविसने २९ चेंडूत ४१ धावांची प्रभावी साथ देत मधल्या षटकांत धावगती कायम ठेवली. सॅमसन–ब्रेविस यांची वेगवान भागीदारी हा डावाचा खरा पाया ठरली. याच भागीदारीमुळे चेन्नईने १९० चा टप्पा पार केला.



शेवटच्या षटकांत शिवम दुबे आणि जेमी ओव्हरटन यांनी जलद धावा जोडत कोलकातासमोर आव्हान अधिक भक्कम केले. कोलकाताकडून कार्तिक त्यागीने ४ षटकांत ३५ धावांत २ बळी घेत सुरुवातीला काहीसा प्रतिकार केला. सुनील नरेननेही मधल्या षटकांत धावगती रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र सामन्याचा पहिला टर्निंग पॉइंट १७व्या षटकात दिसला. त्या षटकात चेन्नईच्या फलंदाजांनी सलग चौकार–षटकार ठोकत अतिरिक्त १५ ते २० धावा उभारल्या. हाच उशिराचा वेग अखेरीस निर्णायक ठरला. १९३ धावांच्या पाठलागात कोलकाताची सुरुवात सावध झाली. अजिंक्य रहाणे आणि अंगकृष रघुवंशी यांना मोठी खेळी करता आली नाही. मधल्या फळीत रामनदीप सिंगने २३ चेंडूत ३५ धावा करत लढा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या टोकाला रोव्हमन पॉवेलने २२ चेंडूत ३१ धावांची झुंजार खेळी केली. काही काळ ही भागीदारी आशादायक वाटत होती; मात्र आवश्यक धावगती सातत्याने वाढत गेल्याने दबाव कोलकातावरच राहिला. सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट १४व्या षटकात दिसला. त्या टप्प्यात नूर अहमदने अचूक फिरकी टाकत सलग महत्त्वाच्या विकेट्स घेत कोलकाताचा कणा मोडला. त्याच्या ४ षटकांत २१ धावांत ३ बळी या भेदक स्पेलने पाठलागाची लय पूर्णपणे विस्कळीत केली. दुसऱ्या टोकाला अंशुल कांबोजने २ बळी घेत नूरला प्रभावी साथ दिली. शेवटच्या षटकांत कोलकाताला मोठे फटके खेळता न आल्याने चेन्नईने ३२ धावांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. या सामन्यात अनेक महत्त्वाचे विक्रम नोंदले गेले. चेन्नई सुपर किंग्जचा हा सलग दुसरा विजय ठरला. कोलकाता नाईट रायडर्सचा हंगामातील विजयविरहित प्रवास अधिकच कठीण झाला. नूर अहमदचे ३/२१ हे चेपॉकवरील या मोसमातील सर्वात प्रभावी फिरकी स्पेलपैकी एक ठरले. संजू सॅमसनने सलग दुसऱ्या सामन्यात प्रभावी खेळी करत मधल्या फळीतील सातत्य सिद्ध केले. या विजयामुळे चेन्नई गुणतालिकेत वर सरकली, तर कोलकाता तळाशी घसरली. या विजयाने चेन्नई सुपर किंग्जचा आत्मविश्वास निश्चितच उंचावला आहे.

# जास्त वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

जन सम्राट टाईम्स

मुंबई : वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना लगाम घालण्यासाठी केंद्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्यासाठी मोटार वाहन अधिनियम, १९८८ अंतर्गत केंद्रीय मोटार वाहन नियमावली, १९८९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी राज्य सरकार करणार असून पाच पेक्षा जास्त वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर गंभीर अपराध म्हणून कारवाई केली जाईल



असे परिवहन विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर गंभीर अपराध म्हणून कारवाई करण्यात येणार आहे. मागील वर्षातील उल्लंघनांची गणना पुढील वर्षात केली जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. ई-चलान प्रणाली अधिक पारदर्शक व डिजिटल करण्यावरही भर देण्यात आला आहे. पोलीस अधिकारी किंवा राज्य शासनाने अधिकृत केलेला अधिकारी प्रत्यक्ष अथवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चलान जारी करू शकणार आहे. इलेक्ट्रॉनिक निरीक्षण यंत्रणेद्वारे स्वयंचलित चलान जारी करण्याची सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे. प्रत्यक्ष चलान १५ दिवसांच्या आत, तर ई-चलान ३ दिवसांच्या आत संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# आंबेडकर जयंतीनिमित्त कुराण पठण व समाजहितासाठी प्रार्थना

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने उपक्रम

जन सम्राट टाईम्स




नालासोपारा : १४ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त देशभरात विविध कार्यक्रम, रॅली आणि उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर नालासोपारा पूर्व येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर.के) च्या कार्यालयात एक वेगळा आणि सामाजिक सलोखा जपणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार B. R. AMBEDKAR यांना अभिवादन करत, सर्व समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी कुराण पठण (कुराण खानी) करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व पक्षाचे केंद्रीय सचिव मा. जावेद पटवारी यांनी केले. यावेळी जावेद पटवारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे आज प्रत्येक भारतीय नागरिक सन्मानाने आणि अधिकाराने जीवन जगत आहे. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळाला असून, त्यांचे योगदान संपूर्ण देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र संघटिका मा. निगार शेख यांच्या उपस्थितीत मदरशातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना चॉकलेट्स, बिस्किटे आणि ज्यूसचे वाटप करून त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. तसेच जावेद पटवारी यांनी मदरशातील विद्यार्थ्यांसाठी एक महिन्याचे अन्नधान्य देऊन सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाच्या शेवटी जावेद पटवारी आणि निगार शेख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले. तसेच त्यांच्या विचारांची उजळणी करत सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक एकात्मता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचा संदेश देण्यात आला. "जय भीम, जय संविधान" या घोषणांनी कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पक्षाध्यक्ष मा. राजाराम खरात यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

### सामाजिक बांधिलकी जपली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यामुळे आज प्रत्येक भारतीय नागरिक सन्मानाने आणि अधिकाराने जीवन जगत आहे. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळाला असून, त्यांचे योगदान संपूर्ण देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र संघटिका मा. निगार शेख यांच्या उपस्थितीत मदरशातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना चॉकलेट्स, बिस्किटे आणि ज्यूसचे वाटप करून त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. तसेच जावेद पटवारी यांनी मदरशातील विद्यार्थ्यांसाठी एक महिन्याचे अन्नधान्य देऊन सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाच्या शेवटी जावेद पटवारी आणि निगार शेख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# पुण्यात 'यश प्रतिभा गौरव पुरस्कार' सोहळा दिमाखात संपन्न

## आत्मसिद्ध मिशन व विश्व मराठी परिवाराचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स



मुंबई : पुण्यातील डेक्कन परिसरात 'यश प्रतिभा गौरव पुरस्कार' सोहळा उत्साही आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. आत्मसिद्ध मिशन आणि विश्व मराठी परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यात देश-विदेशातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.हॉटेल ग्रीन सिग्नल, नीलमल हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमात सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता आणि सर्जनशील क्षेत्रातील योगदानाची दखल घेत अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. वनराई संस्थेचे संस्थापक Ravindra Dharia यांच्या वतीने संस्थेचे सचिव अमितजी, कविराज विजयराव सातपुते, लेखक-पत्रकार-गीतकार श्रीपाद कुलकर्णी, व्यंगचित्रकार नीरज सबनीस तसेच उदयोन्मुख नेतृत्व पूजा प्रतुल जागडे यांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती कटके होते. त्यांच्या मार्गदर्शक आणि विचारप्रवर्तक भाषणाने उपस्थितांना नवी दिशा दिली. प्रमुख पाहुणे म्हणून जयप्रकाश नेऊरगावकर हे आपल्या सौभाग्यवतींसह उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संयोजन तपेंद्र, गजानन, समता आणि सोनाली यांनी केले. संपूर्ण सोहळ्यात शिस्तबद्ध मांडणी, आकर्षक सादरीकरण आणि प्रसन्न वातावरण यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. चारुता आपटे यांच्या सुमधुर गायनाने सभागृहात भावपूर्ण आणि मंत्रमुग्ध करणारे वातावरण निर्माण झाले. आत्मसिद्ध मिशनचे प्रमुख राजेशजी यांनी आपल्या प्रभावी संवादातून आत्मविकास, सकारात्मकता आणि प्रेरणेचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचवला.

### यांची होती उपस्थिती

या सोहळ्यास प्रा. संजय पवार, सुमंगला बाकरे, सनील गाडेकर, माही मस्के, तहेसीन चिंचोलीकर, आकाश मोरे, प्रा. डॉ. प्रियांका जोशी, खाद्यसंस्कृती तज्ज्ञ मानसी भोसले, सुयोग कुलकर्णी, प्रा. लहू काळे, माधुरी ओरसे, कोमल जाधव, नम्रता, पौर्णिमा यादव, समाजकल्याण अधिकारी शिरसाट साहेब, राष्ट्रीय पिस्तूल चॅम्पियन प्रथमेश गायकवाड, सिनेअभिनेत्री नंदिनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.